**महाराष्ट्र शासन.**

**निवडणूक नियम**

क्रमांक-एमएमसी-२००७/४८१/प्र.क्र.१९/२००८/नवि-३२
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दिनांक २० जून, २००९.

प्रति,
(१) सर्व महानगरपालिकांचे महापौर, (मुंबई महानगरपालिका वगळून)
(२) प्रधान सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासन भवन, मुंबई
(३) सर्व महानगरपालिका आयुक्त, (मुंबई महानगरपालिका वगळून)
(४) आयुक्त तथा संचालक नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
(५) सर्व विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक नगर परिषद प्रशासन संचालनालय
(६) सर्व जिल्हाधिकारी,
(७) सर्व नगर परिषदा/नगर पंचायती यांचे मुख्याधिकारी,
(८) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई (व्यापक प्रसिध्दीसाठी)
(९) संचालक, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, एम.एन.रॉय. कॅम्पस, टी.पी.एस.रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

**विषय :-नागपूर शहर पालिका निवडणूक नियम, (सुधारणा) नियम, २००९, मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( महानगरपालिकेची निवडणूक घेणे) (अनुसूची घ ची सुधारणा) नियम, २००९, महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती निवडणूक (सुधारणा) प्रारुप नियम, २००९.**

**महोदय,**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८, आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अंतर्गत निवडणूकीपूर्वी भरावयाच्या अनामत रक्कमेबाबत प्रारुप नियम, दिनांक २० जून, २००९ च्या शासन अधिसूचनेची प्रत सोबत पाठविण्यात येत आहे. संबंधित महानगरपालिकांचे आयुक्त आणि नगर परिषदा/नगर पंचायती यांचे मुख्याधिकारी यांनी या प्रारुप नियमांना त्यांच्या क्षेत्रात व्यापक प्रसिध्दी देऊन प्रारुप नियमांच्या प्रती त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर उपलब्ध कराव्यात.

**सही/-**
**(फ.ब.खान)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत :- सादर अग्रेषित (अधिसूचनेच्या प्रतीसह)
(१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
(२) मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव,
(३) प्रधान सचिव (नगर विकास विभाग) मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
(४) सचिव (नगर विकास विभाग), मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक,
(५) नगर विकास विभागातील सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी,
(६) वेब कोऑर्डिनेटर (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
(७) निवडनस्ती (नवि-३२)

## नगरविकास विभाग

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २० जून २००९.

## अधिसूचना.

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९.**

क्रमांक-एमएमसी-२००७/४८१/प्र.क्र.१९/नवि-३२-मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई एकोणसाठ) अंतर्गत अनुसूची घ मधील नियमांमध्ये सुधारणा करण्याकरितां महाराष्ट्र शासन पुढील नियमांचा मसूदा, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई एकोणसाठ) च्या कलम ४५६ अ चे पोट-कलम (१) याद्वारे प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारांचा व त्याबाबतीत त्यास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन उक्त अधिनियमाच्या उक्त कलम ४५६-अ चे पोटकलम (२) च्या आवश्यकतेनुसार या नियमांमुळे बाधित होण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिध्द करण्यांत येत आहे आणि याद्वारे अशी नोटीस देण्यांत येत आहे की, उक्त मसूदा महाराष्ट्र शासन ही अधिसूचना **राजपत्रात** प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांत किंवा त्यानंतर विचारात घेईल.

उक्त मसुद्यासंबंधात उपरोक्त तारखेपुर्वी, कोणत्याही व्यक्तीकडून सचिव (२), महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांचेकडे आलेल्या कोणत्याही हरकती किंवा सूचना महाराष्ट्र शासनाकडून विचारात घेतल्या जातील.

## नियमांचा मसुदा.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ ( १९४९ चा मुंबई एकोणसाठ) च्या कलम ४५६ अ चे पोट-कलम (१) याद्वारे प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारांचा व त्याबाबतीत त्यास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई एकोणसाठ) अंतर्गत अनुसूची घ मधील नियम जे उक्त अधिनियमाच्या पोट-कलम (२) मधील आवश्यकतेनुसार पूर्वी प्रसिध्द करण्यांत आले होते त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे ते असे :-

१. या नियमांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महानगरपालिकेची निवडणूक घेणे) (अनुसूची ’घ" ची सुधारणा) नियम, २००९ असे म्हणावे.

२. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या अनुसूची ’ घ ’मधील नियमाच्या नियम १० च्या पोट-नियम (१) च्या ऐवजी खालील पोट-नियम दाखल करण्यांत येईल:-

"(१) एखाद्या प्रभाग निवडणूकीसाठी उमेदवाराच्या नामनिर्देशनासाठी नियत केलेल्या दिनांकाला किंवा त्यापूर्वी उमेदवाराने रुपये पाच हजार एवढी रोख रक्कम निवडणूक अधिका-यांकडे ठेव म्हणून जमा केली पाहिजे किंवा करण्याची व्यवस्था केली पाहिजे. उमेदवाराने अशी ठेव न भरल्यास तो योग्यरितीने नामनिर्देशित झाला असल्याचे मानण्यात येणार नाही :

परंतु, जेव्हा उमेदवार, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा नागरिकांचा मागासवर्ग किंवा महिला यामधील असेल आणि अशा उमेदवाराने त्याचे महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० च्या तरतूदींना अनुसरुन, सक्षम प्राधिका-याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर केलेले असेल तर अशा बाबतीत, उमेदवाराने अशाप्रकारे ठेवावयाची अनामत रक्कम दोन हजार पाचशे इतकी असेल :

परंतू , आणखी असे की, जेव्हा उमेदवाराने एकाच जागेसाठी एकापेक्षा अधिक नामनिर्देशन पत्रे दाखल केली असल्यास, एकापेक्षा अधिक वेळा रक्कम जमा करण्याची आवश्यकता नाही."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

फ. ब. खान,

शासनाचे उप सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Manrtalaya, Mumbai 400 032, dated the 20th June 2009.

## *NOTIFICATION*

**THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATION ACT, 1949.**

No MMC-2007/481/CR-19/UD 32. – The following draft of the rules further to amend the rules in Schedule 'D' to the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949, which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by sub-section *(1)* of section 456 A of the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949 (Bom.LIX of 1949) ; and of all other powers enabling it in that behalf, is hereby published as required by sub-section (2) of the said Section 456 A of the said Act, for the information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after 30 days from the date of publication of this notification in the O*fficial Gazette.*

2. Any objections of suggestions which may be received by the Secretary (2) to the Government of Maharashtra, Urban Development Department, Mantrayalaya, Mumbai 400 032, from any person with respect to the said draft, before the aforesaid date, will be considered by the Government.

**DRAFT RULES.**

1. In exercise of the powers conferred by sub-section (1) of section 456 A of the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949 (Bom LIX of 1949) : and of all other powers enabling it in that behalf the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the rules in Schedule 'D' to the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949, the same having been previously published, as required by sub-section (2) of section 456 of the said Act as follows :-

2. These rules may be called the Bombay Provincial Municipal Corporations (Conduct of Elections to the Corporations) (Amendment of Schedule 'D') Rules, 2009.

3. In the rules in Schedule 'D' to the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949, in rule 10 for sub-rule (1) , the following sub-rule shall be substituted, namely :-

"(1) On or before the date appointed for the nomination of candidates for a ward election, each candidate shall deposit of cause to be deposited with the Returning Officer, in cash, a sum of five thousand rupees; and no candidate shall be deemed to be duly nominated unless such deposit has been made :

Provided that, where the candidate belongs to the Scheduled Castes or Scheduled Tribes or Backward Class of Citizens, or is a woman , the amount of deposit shall be two thousand and five hundred rupees, if such candidate produces his Caste Certificate issued by the Competent Authority and the Validity Certificate issued by the Scrutiny Committee in accordance with the provisions of the Maharashtra Schedule Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes (Vimukta Jatis), Nomadic Tribes, other Backward Classes and Special Backward Category ( Regulation of Issuance and Verification of) Caste Certificate Act, 2000:

Provided further that, where the candidate has filed more than one nomination paper for the same seat, it shall not be necessary to deposit a separate amount in respect of each nomination paper."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

F. B. KHAN,
Deputy Secretary fo Government.